International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# केंद्रीय अर्थसंकल्प : 2025-26 चे विश्लेषण

**प्रा. ए. व्ही. तगलपल्लेवार**
*अर्थशास्त्र विभाग प्रमुख इंदिरा महाविद्यालय कळंब जि. यवतमाळ.*
*Corresponding Author – प्रा. ए. व्ही. तगलपल्लेवार*
**DOI - 10.5281/zenodo.15250569**

**प्रस्तावना:**

आपल्या सर्वांच्या आयुष्यात अर्थसंकल्प फार महत्त्वाचा असतो. घर खर्च असो किंवा खरेदीसाठी बाहेर जायचे असेल तसेच दैनंदिन गरजा पूर्ण करावयाच्या असतील तर सर्वात आधी आपण आपल्या अर्थसंकल्पाचा विचार करीत असतो आणि नंतरच पैसे कसे खर्च करायचे हे ठरवितो. याचा अर्थ मनुष्याला कुटुंब चालविताना अर्थसंकल्पाचा विचार करावा लागतो .तसाच देशांमध्ये श्रीमंत व्यक्ती, उद्योग, उद्योजक, शेतकरी अशा प्रत्येकांना अर्थसंकल्पाचा विचार करावा लागतो. तशाच पद्धतीने जर देश चालवायचा असेल तर अर्थसंकल्प किंवा बजेटचा विचार अधिक व्यापक दृष्टिकोनातून करावा लागतो. म्हणून अर्थसंकल्पाबाबत प्रत्येक व्यक्तीला माहिती असणे आवश्यक आहे. या ठिकाणी आपण 2025- 26 च्या अर्थसंकल्पाची माहिती बघणार आहोत.

**अर्थसंकल्पाचा अर्थ(Meaning of Budget):**

अर्थसंकल्प म्हणजे भविष्यामध्ये होणाऱ्या खर्च आणि उत्पन्नाचा एक अहवाल किंवा आराखडा होय.यामध्ये विविध योजना आणि उद्दिष्टांच्या आधारावर भविष्यामध्ये होणाऱ्या उत्पन्नाचा आणि खर्चाचा एक प्रकारचा आराखडा तयार केला जातो. या आराखड्याच्या सहाय्याने विविध क्षेत्रांमधून अंदाजे किती उत्पन्न प्राप्त होणार आहे आणि त्यामधून वेगवेगळ्या योजनावर आणि सेवावर किती खर्च करू शकतो याचे एक अंदाजीत तयार केले केलेले अनुमान असते.

सरकार पुढील एक वर्षाच्या कालावधी करिता जो वित्तीय आराखडा सभागृहासमोर मंजुरीसाठी ठेवतो त्याला 'अंदाजपत्रक' असे म्हणतात. अंदाजपत्रकालाच 'अर्थसंकल्प' असे म्हणतात. अर्थसंकल्पाला इंग्रजीत 'Budget' असे म्हणतात. बजेट हा शब्द फ्रेंच भाषेतील **'Budgetti'** या शब्दापासून तयार झाला आहे. म्हणजे **"चामड्याची पिशवी"** किंवा **"चामड्याची बॅग"**. 1733 मध्ये बजेट हा शब्द इंग्लंडमध्ये "**जादूची पेटी"** या अर्थाने वापरला गेला. सर्व देशांमध्ये बजेटमध्ये असलेल्या बाबी संसदेत मांडेपर्यंत गुप्त ठेवण्याची परंपरा आहे. त्यामुळे याला **'मॅजिक बॉक्स'** असे म्हटले जाते. भारतातही हीच परंपरा आहे. बजेट हा शब्द फ्रान्समध्ये वापरला गेला.

अर्थसंकल्प हा एका वर्षाच्या कालावधीसाठी तयार केला जातो. यामध्ये सरकार आगामी आर्थिक वर्षातील अंदाजे उत्पन्न आणि खर्चाचा तपशील त्यामध्ये दिला जातो. एकूणच देशातील विविध उत्पन्न साधनांचे व खर्चाच्या बाबींचे विवरण करणारी प्रशासकीय कागदपत्रे म्हणजे अर्थसंकल्प होय भारतामध्ये अर्थसंकल्प हा सामान्यपणे 1 एप्रिल ते 31 मार्च अशा आर्थिक वर्षासाठी तयार केला जातो.

नरेंद्र मोदी सरकारच्या तिसऱ्या टप्प्यातील अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी 2 फेब्रुवारी 2025 रोजी सलग आठवा अर्थसंकल्प सादर केला. वाढती

महागाई, घटलेले रोजगार, खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीचा कमी झालेला ओघ तसेच वाढलेली महागाई, घटलेले उत्पन्न व आणि छोट्या वस्तूवर आकारला जाणारा वस्तू व सेवा कर (जीएसटी) यामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील मध्यमवर्गीयांची क्रयशक्ती कमी झालेले आहे. यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक विकासाची गती मंदावलेली दिसून येते. अशा परिस्थितीत निर्मला सीतारामन यांनी अर्थव्यवस्थेत नवचैतन्य निर्माण करण्याच्या उद्देशाने सण 2025 - 26 चा अर्थसंकल्प संसदेमध्ये सादर केला. या अर्थसंकल्पाचे विश्लेषण या ठिकाणी बघणार आहोत.

**भाग अ:**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प 2025-26 सादर केला. अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:

**2025-26 चे अंदाजपत्रक:**

- कर्जाव्यतिरिक्त एकूण उत्पन्न आणि एकूण खर्च अनुक्रमे 34.96 लाख कोटी रुपये आणि 50.65 लाख कोटी रुपये राहील असा अंदाज आहे.
- निव्वळ कर महसूल 28.37 लाख कोटी रुपये राहील असा अंदाज आहे.
- वित्तीय तूट जीडीपीच्या 4.4 टक्के असेल असा अंदाज आहे.
- बाजारातील एकूण कर्ज अंदाजे 14.82 लाख कोटी रुपये आहे.
- वित्त वर्ष 2025-26 मध्ये भांडवली खर्चासाठी 11.21 लाख कोटी (जीडीपीच्या 3.1%) रुपये तरतूद आहे.

**विकासाचे पहिले इंजिन - कृषी क्षेत्र :**

**पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना**

- देशातील विकसनशील 100 जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांसाठी पंतप्रधान धन -धान्य योजना राबविण्यात येणार आहे. ही योजना राज्य सरकारच्या मदतीने राबविण्याचे ठरविण्यात आले. यामध्ये कमी उत्पादकता, मध्यम पीक क्षमता आणि सरासरी पेक्षा कमी कर्ज माफ दंड असलेले 100 जिल्हे योजनेमध्ये समाविष्ट केले जाणार. या योजनेचा 1.7 कोटी शेतकऱ्यांना लाभ मिळेल.
- कमी उत्पादकता असणाऱ्या शंभर जिल्ह्यात उत्पादकता वाढीची योजना राबविली जाणार. यामध्ये पिकांच्या एकसुरीपणा ऐवजी विविधता, हंगामानंतर साठवण व्यवस्था उत्तम, उत्पादनास आवश्यक जलसिंचन सुविधा, पतपुरवठा सुविधा उपलब्ध करून देणे अशी एकत्रित पॅकेज सुविधा दिली जाणार. शेती क्षेत्रातील वाढत्या उत्पन्नामुळे समृद्धी येईल.

**ग्रामीण समृद्धी आणि लवचिकता निर्माण करणे:**

- कौशल्य विकास, गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी कृषी क्षेत्रातील अल्प-रोजगाराची समस्या दूर करण्यासाठी राज्यांबरोबर भागीदारीत एक व्यापक बहु-क्षेत्रीय कार्यक्रम सुरू केला जाईल. सरकारने ग्रामीण विकासासाठी अर्थसंकल्पात 2 लाख 67 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे.
- 1.5 लाख ग्रामीण पोस्ट ऑफिसला लॉजिस्टिक केंद्रात बदलण्यात येणार आहे. पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या चौथ्या टप्प्याला प्रारंभ करण्यात आला असून ग्रामीण भागातील खेडी वस्त्यांना जोडण्यावर भर दिला जाणार आहे.

**डाळींच्या बाबतीत आत्मनिर्भरता:**

- केंद्रीय अर्थसंकल्पात, उडीद आणि मसूर डाळीच्या उत्पादन वाढीसाठी आत्मनिर्भरता अभियानाची घोषणा केली. यामुळे डाळीचे उत्पादन वाढवून स्थानिक पातळीवरच पुरेसा माल उपलब्ध होईल. सहा वर्ष राबविल्या जाणाऱ्या आत्मनिर्भरता अभियानामध्ये तूर, उडीद, मसूर या डाळींचे बी -बियाणे.विकसित केले जाणार आहे. या बियाणामुळे उत्पादनात वाढ. शिवाय प्रतिकूल वातावरणाचाही त्यावर परिणाम होणार. अति

पाऊस किंवा कमी पाऊस याशिवाय साठवणूक सुविधा देखील निर्माण केल्या जातील.

- नाफेड आणि एनसीसीएफ आगामी 4 वर्षात शेतकऱ्यांकडून या डाळींची खरेदी करतील.

**भाजीपाला आणि फळांसाठी सर्वसमावेशक कार्यक्रम:**

- उत्पादन, कार्यक्षम पुरवठा, प्रक्रिया आणि शेतकऱ्यांसाठी रास्त किंमतींना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यांबरोबर भागीदारीत एक व्यापक कार्यक्रम सुरू केला जाईल.

**बिहारमध्ये मखाना मंडळ:**

- मखानाचे उत्पादन, प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि विपणन सुधारण्यासाठी मखाना मंडळ स्थापन केले जाईल.

**उच्च उत्पन्न देणाऱ्या बियाण्यांसाठी राष्ट्रीय अभियान:**

- उच्च उत्पन्न देणाऱ्या बियाण्यांसाठी राष्ट्रीय अभियान सुरू करण्यात येणार आहे, ज्याचा उद्देश संशोधन परिसंस्था बळकट करणे, उच्च उत्पन्न असलेल्या बियाणांचा लक्ष्यित विकास आणि प्रसार तसेच 100 हून अधिक प्रकारच्या बियाणांची व्यावसायिक उपलब्धता हा आहे.

**मत्स्यव्यवसाय:**

- सरकार अंदमान, निकोबार आणि लक्षद्वीप बेटांवर विशेष लक्ष केंद्रित करून, भारतीय विशेष आर्थिक क्षेत्र आणि खोल समुद्रांमध्ये मत्स्यपालनाच्या शाश्वत वापरासाठी एक आराखडा सादर करणार आहे. .

**कापूस उत्पादकतेसाठी अभियान:**

- कापूस लागवडीची उत्पादकता आणि शाश्वतता यामध्ये लक्षणीय सुधारणा करण्यासाठी आणि अधिक लांब धाग्याच्या कापूस वाणांना प्रोत्साहन देण्यासाठी 5 वर्षांच्या अभियानाची घोषणा केली आहे.

**किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) :**

- केसीसी मार्फत घेतलेल्या कर्जासाठी सुधारित व्याज सवलत योजनेअंतर्गत कर्ज मर्यादा 3 लाख रुपये वरून 5 लाख रुपये पर्यंत वाढवली जाईल.

**आसाममध्ये युरिया प्रकल्प:**

- आसाममधील नामरूप येथे वार्षिक 12.7 लाख मेट्रिक टन क्षमतेचा प्रकल्प उभारला जाईल.

**विकासाचे दुसरे इंजिन – एमएसएमई:**

भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका निभावणारे क्षेत्र म्हणजे एमएसएमई होय. या क्षेत्रासाठी 2025- 26 चे अंदाजपत्रकात भरीव तरतुदी केल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे-

**एमएसएमईसाठी वर्गीकरण निकषांमध्ये सुधारणा:**

- सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांचे वर्गीकरणाच्या मर्यादेत भरीव प्रमाणात वाढ करण्यात आली. सूक्ष्म उद्योगासाठी 5 कोटी पासून 10 कोटी, लघु उद्योगासाठी 50 कोटी ऐवजी 100 कोटी व मध्यम उद्योगासाठी 250 कोटी ऐवजी 500 कोटी मर्यादा केल्या आहेत. ही वाढ दोन ते 2.5 पटीने करण्यात आली. यामुळे एमएसएमई उद्योगाच्या विस्तारासाठी चांगलवाव मिळणार आहे.

**सूक्ष्म उपक्रमांसाठी क्रेडिट कार्ड:**

- उद्यम पोर्टलवर नोंदणीकृत सूक्ष्म उद्योगांसाठी 5 लाख रुपये मर्यादेसह सानुकूलित क्रेडिट कार्ड, पहिल्या वर्षी 10 लाख कार्ड जारी केले जातील.

**स्टार्टअप्ससाठी विस्तारित निधी:**

- अलीकडील काळात भारतीय अर्थव्यवस्थेत नव - स्टार्टअप्स मोठ्या प्रमाणात सुरू झाले. त्यातील अनेक स्टार्टअप्स नी मोलाची कामगिरी केली. त्यामुळे 2025 -26 च्या अर्थसंकल्पामध्ये स्टार्टअप्स च्या विकासासाठी 10000 कोटी रु च्या विस्तारित निधीची स्थापना केली जाणार आहे. तसेच स्टार्टअप्स साठी कर सवलतीचा कालावधी वाढवण्यात आला.

**नव -उद्योजकांसाठी योजना:**

- 5 लाख महिला, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील नव -उद्योजकांना पुढील 5 वर्षात 2 कोटी रुपयांपर्यंत मुदत-कर्ज प्रदान करणारी नवीन योजना घोषित करण्यात आली आहे.

**पादत्राणे आणि चामडे क्षेत्रावर केंद्रित उत्पादन योजना:**

- भारताच्या पादत्राणे आणि चामड्याच्या क्षेत्राची उत्पादकता, गुणवत्ता आणि स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी, 22 लाख व्यक्तींना रोजगार देणारी, 4 लाख कोटींची उलाढाल आणि 1.1 लाख कोटी रूपयांहून अधिक निर्यात करण्यासाठी केंद्रित उत्पादन योजना जाहीर करण्यात आली आहे.

**खेळणी क्षेत्रासाठी उपाययोजना:**

- उच्च-दर्जाची, अनोखी, नाविन्यपूर्ण आणि टिकाऊ खेळणी तयार करण्यासाठी आणि भारताला खेळण्यांचे जागतिक केंद्र बनवण्यासाठी योजनेची घोषणा.

**अन्न प्रक्रियेसाठी सहाय्य:**

- बिहारमध्ये राष्ट्रीय अन्न तंत्रज्ञान, उद्योजकता आणि व्यवस्थापन संस्था स्थापन केली जाईल.

**उत्पादन मोहीम - "मेक इन इंडिया" ला चालना:**

- "मेक इन इंडिया" ला चालना देण्यासाठी लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योगांचा समावेश असलेल्या राष्ट्रीय उत्पादन मोहीमेची घोषणा करण्यात आली.

**ईव्ही वाहन उद्योग:**

- इलेक्ट्रिक वाहन ईव्ही उद्योगाला चालना देण्यासाठी अर्थसंकल्पात ईव्ही बॅटरी आणि त्यासाठी लागणाऱ्या 35 घटकावरील सीमा शुल्क रद्द केले त्याचा थेट फायदा ईव्ही च्या किमती स्वस्त होण्याच्या रूपाने दिसून येणार निवि उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या निधीमध्ये 20 टक्के वाढ करण्यात आली आहे.
- ईव्ही वाहनासाठी लागणारी बॅटरी तसेच सोलर सेल्स यांच्या उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी यासाठी लागणारे महत्त्वाच्या घटकावरील प्राथमिक सीमाशुल्क रद्द करण्यात येत आहे यामुळे उत्पादन निर्मितीचा खर्च कमी होणार आहे.

**विकासाचे तिसरे इंजिन म्हणून गुंतवणूक:**

**I. लोकसहभाग वाढवणे:**

**सक्षम अंगणवाडी आणि पोषण 2.0 :**

- सक्षम अंगणवाडी आणि पोषण योजना 8 कोटी होऊन अधिक लहान मुलांना 20 लाख किशोरवयीन मुलींना पोषणमूल्य मिळणार.
- देशभरातील 1 कोटी गर्भवती आणि स्तनदा मातांना 1 लाख किशोरवयीन मुलींना पोषणमूल्य वाढवणार , ईशान्य भारतातही विशेष लक्ष देण्यात येणार .

**अटल टिंकरिंग लॅब:**

- शालेय विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती वाढीस लागण्यासाठी पुढील 5 वर्षांत सरकारी शाळांमध्ये 50,000 अटल टिंकरिंग लॅब उभारण्यात येणार आहेत.

**सरकारी माध्यमिक शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी:**

- भारतनेट प्रकल्पाअंतर्गत ग्रामीण भागातील सर्व सरकारी माध्यमिक शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांना ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी प्रदान केली जाईल.

**भारतीय भाषा पुस्तक योजना:**

- शालेय आणि उच्च शिक्षणासाठी डिजिटल स्वरूपातील भारतीय भाषा पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय भाषा पुस्तक योजना जाहीर करण्यात आली.

**नॅशनल सेंटर्स ऑफ एक्सलन्स फॉर स्किलिंग:**

- "मेक फॉर इंडिया, मेक फॉर द वर्ल्ड" उत्पादनासाठी आवश्यक कौशल्यांसह युवकांना

सुसज्ज करण्यासाठी जागतिक कौशल्य आणि भागीदारीसह 5 राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्रे स्थापन केली जातील.

**भारतीय तंत्रज्ञान संस्था-आयआयटीच्या क्षमतेचा विस्तार:**

- 2014 नंतर सुरु झालेल्या 5 आयआयटीं मध्ये आणखी 6,500 विद्यार्थ्यांना शिक्षणाची सुविधा देण्यासाठी अतिरिक्त पायाभूत सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत.

**संशोधनासाठी स्कॉलरशिप :**

- पंतप्रधान संशोधन शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पुढील 5 वर्षात सुधारित आर्थिक सहाय्यसह आयआयटी आणि आयआयएससी मध्ये तांत्रिक संशोधनासाठी 10 हजार फेलोशिप दिल्या जाणार आहेत.

**शिक्षणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) उत्कृष्टता केंद्र:**

- शिक्षणासाठी एआय उत्कृष्टता केंद्राच्या स्थापनेसाठी एकूण 500 कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

**वैद्यकीय शिक्षणाचा विस्तार:**

- पुढील वर्षी वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांमध्ये 10,000 अतिरिक्त जागांची तर आगामी 5 वर्षांत 75000 जागांची भर पडणार आहे

**सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये डे केअर कॅन्सर सेंटर्स:**

- सरकार पुढील 3 वर्षांत सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये डे केअर कॅन्सर केंद्रांची तर 2025-26 या वर्षात 200 केंद्रांची उभारणी केली जाईल.

**शहरी उपजीविका मजबूत करणे:**

- शहरी कामगारांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी ही योजना असून त्यांचे उत्पन्न सुधारण्यासाठी आणि त्यांना उपजीविकेचे शाश्वत साधन मिळावे यासाठी या योजनेची घोषणा करण्यात आली आहे.

**पीएम स्वनिधी:**

- योजनेत सुधारणा केली जाईल, बँकांकडून वाढीव कर्ज, 30,000 रुपये मर्यादेसह युपीआय संलग्न क्रेडिट कार्ड आणि क्षमता निर्मितीसाठी सहाय्य पुरवले जाईल.

**ऑनलाइन प्लॅटफॉर्म कामगारांच्या कल्याणासाठी सामाजिक सुरक्षा योजना:**

- सरकार गिग- कामगारांना ओळखपत्र, ई-श्रम पोर्टलवर नोंदणी आणि पीएम जन आरोग्य योजनेअंतर्गत आरोग्यसेवा मिळण्याची व्यवस्था करेल.

**II. अर्थव्यवस्थेत गुंतवणूक :**

**पायाभूत सुविधांमध्ये सार्वजनिक खाजगी भागीदारी:**

- पायाभूत सुविधा-संबंधित मंत्रालये सार्वजनिक खाजगी भागीदारीमध्ये 3 वर्षांमध्ये पूर्ण होणारे प्रकल्प सादर करतील, राज्यांनाही प्रोत्साहन देण्यात आले आहे.

**पायाभूत सुविधांसाठी राज्यांना सहाय्य:**

- नागरी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याकरिता राज्यांना 50 वर्षांच्या व्याजमुक्त कर्ज पुरवण्यासाठी 1.5 लाख कोटींचा तरतूद केली आहे.

**मालमत्ता मुद्रीकरण योजना 2025-30 :**

- नवीन प्रकल्पांमध्ये 10 लाख कोटींचे भांडवल परत आणण्यासाठी 2025-30 ची दुसरी योजना जाहीर करण्यात आली.

**शहरी आव्हान निधी:**

- 'शहरांना विकास केंद्रे बनवणे', 'शहरांचा सर्जनशील पुनर्विकास' आणि 'पाणी आणि स्वच्छता' या प्रस्तावांची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच 2025-26 साठी प्रस्तावित 10,000 कोटी रुपये तरतुदीसाठी 1 लाख कोटी रुपयांच्या शहरी आव्हान निधीची घोषणा करण्यात आली आहे.

**विकसित भारतासाठी अणुऊर्जा अभियान:**

- अणुऊर्जा कायदा आणि आण्विक नुकसानीसाठी नागरी दायित्व कायद्यात सुधारणा हाती घेण्यात येणार आहेत.
- 20,000 कोटी रुपयांच्या खर्चासह लघु मॉड्यूलर रिॲक्टर्स (एसएमआर) च्या संशोधन आणि विकासासाठी अणुऊर्जा अभियान सुरू करण्यात येणार आहे, 2033 पर्यंत 5 स्वदेशात विकसित एसएमआर कार्यरत होतील.

**जहाजबांधणी:**

- जहाजबांधणी आर्थिक सहाय्य धोरणात सुधारणा करण्यात येणार आहे. तसेच बंदरे व जहाज बांधणी या क्षेत्राकरिता 3471 कोटीची तरतूद करण्यात आली आहे.
- निर्दिष्ट आकारापेक्षा जास्त मोठी जहाजे पायाभूत सुविधांच्या सुसंगत मुख्य यादीमध्ये (एचएमएल) समाविष्ट केली जातील.

**सागरी विकास निधी:**

- 25,000 कोटी रुपयांचा सागरी विकास निधी उभारण्यात येणार आहे. यात सरकारकडून 49 टक्के योगदान तर बंदरे आणि खाजगी क्षेत्राकडून उर्वरित निधी संकलित केला जाईल.

**उडान - प्रादेशिक संपर्क सुविधा योजना:**

- पुढील 10 वर्षांत 120 नवीन ठिकाणांपर्यंत प्रादेशिक संपर्क सुविधा वाढविण्यासाठी तसेच 4 कोटी प्रवाशांना वाहून नेण्यासाठी सुधारित उडान योजना जाहीर करण्यात आली आहे.
- तसेच डोंगराळ प्रदेश, आकांक्षी जिल्हे आणि ईशान्य भागातील जिल्ह्यांमध्ये हेलिपॅड आणि लहान विमानतळांच्या उभारणीसाठी ही योजना जाहीर करण्यात आली आहे.

**बिहारमधील ग्रीनफील्ड विमानतळ:**

- पाटणा विमानतळाची क्षमता वाढवणे आणि बिहटा येथे ब्राउनफील्ड विमानतळ (म्हणजे अस्तित्वात असलेल्या विमानतळावर केलेली विकासकामे) या व्यतिरिक्त बिहारमध्ये ग्रीनफील्ड विमानतळांची (रिकाम्या जागेवर नव्याने उभारलेले विमानतळ) घोषणा.

**मिथिलांचलमधील पश्चिम कोशी कालवा प्रकल्प:**

- बिहारमधील पश्चिम कोशी कालवा ईआरएम प्रकल्पासाठी आर्थिक सहाय्य.

**खाण क्षेत्रातील सुधारणा:**

- टेलींगमधून (खाणीतून खनिज बाहेर काढल्यावर शिल्लक राहणारा चिखल) महत्त्वपूर्ण खनिजे पुनर्प्राप्त करण्यासाठी धोरणाची निर्मिती.

**स्वामीह निधी 2:**

- सरकार, बँका आणि खाजगी गुंतवणूकदारांच्या योगदानातून आणखी 1 लाख निवासी घरे जलद गतीने पूर्ण करण्यासाठी 15,000 कोटी रुपयांचा निधी जाहीर केला जाईल.

**रोजगार-नेतृत्वाखालील वाढीसाठी पर्यटन:**

- देशातील शीर्ष 50 पर्यटन स्थळे राज्यांबरोबरच्या भागीदारीत आव्हानात्मक पद्धतीने विकसित केली जातील.

**III. नवोन्मेषात गुंतवणूक:**

**संशोधन, विकास आणि नवोन्मेष:**

- जुलैच्या अर्थसंकल्पात खाजगी क्षेत्राद्वारे चालवल्या जाणाऱ्या संशोधन, विकास आणि नवोपक्रम उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी 20,000 कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

**डीप टेकसाठी फंड ऑफ फंडस् :**

- पुढील पिढीतील स्टार्टअप्सना उत्प्रेरित करण्याच्या उद्देशाने डीप टेकसाठी फंड ऑफ फंडस् चा मागोवा घेण्यात येणार आहे आणि त्यांच्या मागणीनुसार निधीची तरतूद केली जाणार आहे.

**पंतप्रधान संशोधन शिष्यवृत्ती :**

- आयआयटी आणि आयआयएससीमध्ये तांत्रिक संशोधनासाठी वाढीव आर्थिक सहाय्यासह 10,000 शिष्यवृत्ती.

**पिकांच्या जर्मप्लाझमसाठी जीन बँक:**

- भविष्यातील अन्न आणि पोषण सुरक्षेसाठी 10 लाख जर्मप्लाझम लाइनसह दुसरी जीन बँक स्थापन करण्यात येणार आहे.

**राष्ट्रीय भूस्थानिक अभियान:**

- पायाभूत भूस्थानिक पायाभूत सुविधा आणि डेटा विकसित करण्यासाठी राष्ट्रीय भूस्थानिक अभियानाची घोषणा करण्यात आली आहे.

**ज्ञान भारतम् अभियान:**

- शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये आणि खाजगी संग्राहकांच्या सोबतीने 1 कोटीहून अधिक हस्तलिखिते जतन करण्यासाठी तसेच आपल्या हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण आणि संवर्धन करण्यासाठी ज्ञान भारतम अभियान हाती घेण्यात येणार आहे.

**विकासाच्या चौथ्या इंजिनाच्या रुपात – निर्यात :**

**निर्यात प्रोत्साहन अभियान:**

- वाणिज्य, सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग तसेच वित्त मंत्रालये यांच्या संयुक्त विद्यमाने क्षेत्रीय आणि मंत्रालयस्तरीय लक्ष्य निर्धारित करुन निर्यात प्रोत्साहन अभियान सुरू केले जाईल.

**भारत ट्रेडनेट:**

- आंतरराष्ट्रीय व्यापारात व्यापार दस्तऐवजीकरण आणि वित्तपुरवठा उपायांसाठी 'भारतट्रेडनेट' (बीटीएन) एक एकीकृत व्यासपीठ म्हणून स्थापन केले जाईल.

**जागतिक क्षमता केंद्रांसाठी (जीसीसी) राष्ट्रीय आराखडा:**

- उदयोन्मुख श्रेणी 2 शहरांमध्ये जागतिक क्षमता केंद्रांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यांना मार्गदर्शक ठरणारा एक राष्ट्रीय आराखडा तयार केला जाईल.

**इंधन विषयक सुधारणा: वित्तीय क्षेत्रातील सुधारणा आणि विकास:**

**विमा क्षेत्रात थेट परकीय गुंतवणूक:**

- संपूर्ण प्रिमियम (लाभांश) भारतात गुंतवणाऱ्या कंपन्यांसाठी विमा क्षेत्रातील एफडीआयची मर्यादा 74 वरून 100 टक्के करण्यात येईल.

**एनएबीएफआयडीकडून कर्ज वृद्धी सुविधा:**

- एनएबीएफआयडी', पायाभूत सुविधा क्षेत्रातील कॉर्पोरेट बाँडसाठी 'आंशिक क्रेडिट एन्हान्समेंट सुविधा' स्थापन करणार '.

**ग्रामीण क्रेडिट स्कोअर (क्रेडिट इतिहासाचा तीन अंकी सारांश):**

- सार्वजनिक क्षेत्रातील बँका बचत गट सदस्य आणि ग्रामीण भागातील लोकांच्या कर्जाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी 'ग्रामीण क्रेडिट स्कोअर' फ्रेमवर्क विकसित करणार.

**निवृत्ती वेतन क्षेत्र:**

- पेन्शन उत्पादनांचा नियामक समन्वय आणि विकासासाठी एक मंच स्थापन केला जाईल.

**नियामक सुधारणांसाठी उच्चस्तरीय समिती:**

- सर्व बिगर वित्तीय क्षेत्रातील नियम, प्रमाणपत्रे, परवाने आणि परवानग्यांचा आढावा घेण्यासाठी नियामक सुधारणांसाठीची उच्चस्तरीय समिती स्थापन केली जाईल.

**राज्यांचा गुंतवणूक मैत्री निर्देशांक:**

- स्पर्धात्मक सहकारी संघराज्याची भावना पुढे नेण्यासाठी 2025 मध्ये राज्यांचा गुंतवणूक मैत्री निर्देशांक सुरू करण्यात येईल.

**जनविश्वास विधेयक 2.0:**

- विविध कायद्यांमधील 100 हून अधिक तरतुदी बिगर गुन्हेगारी स्वरूपाच्या ठरवणारे जनविश्वास विधेयक 2 .0

**भाग B:**

**प्रत्यक्ष कर :**

नव्या कर संरचनेत 12 लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर (भांडवली नफ्यासारख्या विशेष दराच्या व्यतिरिक्त उत्पन्नांना ही सवलत गैर लागू) वैयक्तिक प्राप्तिकर भरावा लागणार नाही.

- पगारदार करदात्यांसाठी ही मर्यादा 12.75 लाख रुपये असेल, कारण 75,000 रुपये स्टँडर्ड डिडक्शन आहे.
- नव्या रचनेमुळे मध्यमवर्गाला भरावा लागणारा कर मोठ्या प्रमाणात कमी होईल आणि त्यांच्या हातात अधिक पैसा शिल्लक राहील, घरगुती वापर, बचत आणि गुंतवणुकीला चालना मिळेल.
- नवीन प्राप्तिकर विधेयक संसदेत सादर करण्यात येणार आहे त्यामध्ये प्राप्तिकर व्यवस्था अधिक सुटसुटीत करण्यात येईल ज्यामुळे कर्जाचे आणि कर प्रशासन यांना तो सहज समजेल आणि त्यामुळे कर जमा करण्याच्या प्रवृत्तीत वाढ होऊन कर संबंधित खटले कमी होतील.
- प्रत्यक्ष करातील सुमारे 1 लाख कोटी रुपयांचा महसूल माफ होणार.

**सुधारित कर दर रचना :**

नव्या कर प्रणालीत सुधारित करदर रचना पुढील प्रमाणे असेल:

| | |
|---|---|
| 0-4 लाख रुपये | शून्य |
| 4-8 लाख रुपये | 5 टक्के |
| 8-12 लाख रुपये | 10 टक्के |
| 12-16 लाख रुपये | 15 टक्के |
| 16-20 लाख रुपये | 20 टक्के |
| 20- 24 लाख रुपये | 25 टक्के |
| 24 लाख रुपयांहून अधिक | 30 टक्के |

**अडचणी कमी करण्यासाठी टीडीएस/टीसीएस मधील तर्कसंगतता :**

- टीडीएस कापण्याचे दर आणि त्याची मर्यादा कमी करून स्रोतावरील कर वजावट (टीडीएस) तर्कसंगत करणे.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी व्याजावरील कर वजावटीची मर्यादा सध्याच्या 50,000 रुपयांवरून 1 लाख रुपये करण्यात आली.
- घर भाड्यावरील टीडीएससाठी वार्षिक 2.40 लाख रुपयांची मर्यादा वाढवून 6 लाख रुपये करण्यात आली.
- रिझर्व्ह बँकेच्या लिबरलाइज्ड रेमिटन्स स्कीम (एलआरएस) अंतर्गत रेमिटन्सच्या स्रोतावर कर (टीसीएस) जमा करण्याची मर्यादा 7 लाख रुपयांवरून 10 लाख रुपये करण्यात आली.
- जास्त टीडीएस कपातीची तरतूद केवळ पॅन विरहित प्रकरणांसाठी लागू होईल.
- निवेदन दाखल करण्याच्या तारखेपर्यंत टिसीएस द्यायला विलंब झाला तर तो गुन्हा ठरणार नाही.

**अनुपालन भार कमी करणे :**

- लहान धर्मादाय न्यास/संस्थांच्या नोंदणीचा कालावधी 5 वर्षांवरून 10 वर्षांपर्यंत वाढवून अनुपालनाचा बोजा कमी केला जाईल.
- स्वमालकीच्या मालमत्तेचे वार्षिक मूल्य शून्य असल्याचा दावा करण्याचा लाभ अशा दोन स्वमालकीच्या मालमत्तांना कोणत्याही अटीशिवाय देण्यात येईल.

**व्यवसाय सुलभता :**

- तीन वर्षांच्या ब्लॉक कालावधीसाठी आंतरराष्ट्रीय व्यवहाराच्या कालावधीची किंमत ठरवण्याची योजना सुरू केली जाईल.
- खटले कमी करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय कर आकारणीत निश्चितता प्रदान करण्यासाठी सेफ हार्बर नियमांची व्याप्ती वाढवली जाईल.
- 29 ऑगस्ट 2024 रोजी किंवा त्यानंतर राष्ट्रीय बचत योजनेतून (एनएसएस) पैसे काढण्यासाठी करातून सूट.
- एनपीएस वात्सल्य खात्यांना सामान्य एनपीएस खात्यांप्रमाणेच एकूण मर्यादेच्या अधीन राहून ही सूट लागू होईल.

**रोजगार आणि गुंतवणूक :**

**इलेक्ट्रॉनिक उत्पादन योजनांसाठी कर निश्चितता:**

- इलेक्ट्रॉनिक उत्पादन सुविधा स्थापन करत असलेल्या किंवा त्या चालविणाऱ्या निवासी कंपनीला सेवा पुरवणाऱ्या अनिवासी कंपन्यांसाठी कर प्रणाली.
- विशिष्ट इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन कारखान्यांना सुट्या भागांचा पुरवठा करण्यासाठी त्यांची साठवणूक करणाऱ्या अनिवासींना संरक्षण पुरविणाऱ्या निश्चित करांचा परिचय

**अंतर्देशीय जहाजांसाठी टनेज कर योजना:**

- देशातील अंतर्देशीय जलवाहतुकीला चालना देण्यासाठी भारतीय जहाज अधिनियम, 2021 अंतर्गत नोंदणीकृत अंतर्देशीय जहाजांना विद्यमान टनेज कर योजनेचे लाभ विस्तारित केले जातील.

**स्टार्ट-अप्सच्या समावेशाच्या कालावधीत वाढ:**

- एक एप्रिल 2030 पूर्वी समाविष्ट होणाऱ्या स्टार्टअप्सना लाभ उपलब्ध करून देण्यासाठी त्यांच्या समावेशन कालावधीत 5 वर्षांनी वाढ

**पर्यायी गुंतवणूक निधी (AIFs):**

- पायाभूत सुविधा आणि तत्सम क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या श्रेणी I आणि श्रेणी II मधील पर्यायी गुंतवणूक निधींना (AIFs) सिक्युरिटीजपासून मिळणाऱ्या लाभांच्या कर आकारणीवर निश्चितता

**सार्वभौम आणि पेन्शन फंडांसाठी गुंतवणुकीच्या मुदतीत वाढ:**

- पायाभूत सुविधा क्षेत्राला सार्वभौम मालमत्ता निधी आणि पेन्शन फंडांकडून निधीपुरवठ्यास चालना देण्यासाठी त्यांना 31 मार्च 2030 पर्यंत आणखी पाच वर्षांसाठी गुंतवणूक करण्याकरिता वाढीव मुदत देण्यात आली आहे.

**अप्रत्यक्ष कर:**

**औद्योगिक वस्तूंवरील सीमा शुल्कासाठी वाजवी संरचना:**

केंद्रीय अर्थसंकल्प 2025-2026 चा प्रस्ताव:

i. सात टॅरिफ दर रद्द. 2023-24 च्या अर्थसंकल्पात सात टॅरिफ दर हटविण्याच्यापेक्षाही हे अधिक आणि पुढचे पाऊल आहे. ते हटवल्या नंतर 'शून्य' दरासह केवळ आठच टॅरिफ दर राहतील.

ii. जिथे अशा शुल्क आकारणीचे प्रमाण किंचित कमी होईल, अशा काही अपवादात्मक वस्तू वगळता, व्यापक प्रभावी शुल्क कायम राखण्यासाठी योग्य उपकर लागू करणे.

iii. एका पेक्षा अधिक उपकर किंवा अधिभाराची आकारणी न करणे. त्यामुळे उपकराच्या अधीन असलेल्या 82 टॅरिफ लाईन्सना समाज कल्याण अधिभारातून सूट देण्यात आली आहे.

**सारांश:**

नरेंद्र मोदी सरकारच्या तिसऱ्या टर्मचा दुसरा अर्थसंकल्प आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सलग आठवा अर्थसंकल्प 1 फेब्रुवारी 2025 रोजी संसदेसमोर सादर केला 2025 - 26 चे अंदाजपत्रक 50.65 लाख कोटी रुपयाचे आहे.

2025 - 26 च्या अर्थसंकल्पात वैयक्तिक कर्जात्यांना आय करात सूट दिली. अर्थसंकल्पात 12 लाख रुपयापर्यंत वार्षिक उत्पन्न करमुक्त केले आहे आणि पंधरा लाख रुपयांवरून 24 लाख रुपयापेक्षा जास्त उत्पन्नावर 30 टक्के दराने कराची आकारणी केली जाईल. यामुळे मध्यमवर्गांच्या हातात आय कराचे वाचणारे उत्पन्न हे उपभोगाच्या माध्यमातून उपभोग्य वस्तूवर खर्च करण्यात येईल त्यामुळे उद्योग- व्यापार क्षेत्रावर अनुकूल परिणाम घडून येईल.

अर्थव्यवस्थेतील सर्वात महत्त्वाचा घटक शेती आहे. शेती क्षेत्राचा विकास संत गतीने होत आहे. या क्षेत्राला चालना देण्यासाठी अर्थसंकल्पत 1.71 लाख कोटी रुपयांची तरतूद केली. याशिवाय काही नव्या योजनांची घोषणा केली. त्यामध्ये किसान क्रेडिट कार्डवर 4 टक्के व्याजाने दिल्या जाणाऱ्या कर्जाची मर्यादा 3 वरून 5 लाख रुपयापर्यंत करण्यात आली आहे. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी कमी उत्पादकता असणाऱ्या 100 जिल्ह्यामध्ये 'पंतप्रधान धन - धन्य योजना' राबविली जाणार आहे. तसेच डाळ, कापूस, युरियाचे उत्पादन वाढविण्याचे लक्ष सुद्धा ठेवण्यात आले आहे.

मानवाची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी अर्थसंकल्पात अनेक घोषणा केल्या आहे. त्यामध्ये आय करीता उत्कृष्ट केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. तसेच IIT ची क्षमता वाढविण्यात येणार आहे आणि वैद्यकीय शिक्षणात 75000 जागांची भर पडणार आहे. त्याचबरोबर महिला व बालकल्याणात वाढ करण्याकरिता अनेक घोषणा सुद्धा करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये अंगणवाडीसाठी 21960 कोटी रुपयाची तरतूद, महिला स्टार्टअप करिता 10000 कोटी रुपयांची तरतूद, गर्भवती माता व किशोरवयीन बालकांच्या पोषण आहारात वाढ करण्यात येणार आहे.

विशेष सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगासाठी च्या पात्रता निकषाच्या मर्यादा वाढविण्यात आल्या आहेत. तसेच या उद्योगांना 10 कोटी रू. पर्यंत कर्ज पुरवठा क्रेडिट गॅरंटी योजनेखाली समाविष्ट केल्याने बँकांना सहज कर्जपुरवठा या उद्योगांना करता येईल. तसेच उद्यान पोर्टलवर नोंदणीकृत सूक्ष्म उद्योजकांसाठी पाच लाख रुपयांची मर्यादा असलेले क्रेडिट कार्ड उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

भारतातील रस्ते पायाभूत सुविधा जागतिक दर्जाच्या करण्यासाठी रस्ते वाहतूक मंत्रालयाच्या बजेट करता 2.87 लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे त्यामुळे देशात मोठ्या प्रमाणात रस्ते उभारण्यात येणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार सुद्धा उपलब्ध होईल.

विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या (EV ) मागणीत वाढ व्हावी यासाठी सरकारने अर्थसंकल्पात EV बॅटरी आणि त्यासाठी लागणाऱ्या 35 घटकावरील सीमाशुल्क रद्द केले. तसेच या उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनातील निधीत 20 टक्के वाढ करण्यात आली.

**संदर्भ सूची :**

1) प्रा.रायखेलकर डॉ.दामाजी, 'स्थूल अर्थशास्त्र व सार्वजनिक वित्त', विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद.
2) https://pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=2098446
3) https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=2098353